पिंपरी चिंचवड महानगरपालिका
वैद्यकीय विभाग, मुख्य कार्यालय
पिंपरी, पुणे ४११ ०१८

**पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या विविध दवाखाना / रुग्णालयांमध्ये तात्पुरत्या स्वरुपात दरमहा एकत्रित मानधनावर पदे भरणेबाबत**

# निवेदन

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वैद्यकीय विभागातर्गंत विविध रुग्णालये व दवाखान्याकरीता दरमहा एकत्रित मानधनावर एकुण १५ संवर्गातील पदे हंगामी स्वरुपात ६ महिने कालावधीसाठी भरणेकरीता दि. ०७-१२-२०२० रोजी जाहिरात प्रसिध्द करण्यात आलेली आहे. सदर जाहिरातीमधील अट क्र. ४ नुसार, "कोवीड१९ प्रादुर्भावाचे पार्श्वभूमीवर लेखी परिक्षांचे आयोजन करणे शक्य नसल्याने, प्रस्तुत जाहिरातीनुसार उमेदवाराने सादर केलेले अर्ज व त्यासोबत जोडलेली कागदपत्रे यांचे आधारे संबंधित उमेदवारांची निवड यादी तयार केली जाणार आहे. याकरिता वरीलप्रमाणे निश्चित केलेल्या शैक्षणिक अर्हतेमधील शेवटच्या वर्षातील गुणपत्रकावरील गुण विचारात घेऊन उमेदवाराची गुणानुक्रम यादी तयार करण्यात येईल व त्याप्रमाणे उमेदवारांची निवड यादी व प्रतिक्षा यादी तयार करणेत येईल", असे नमुद करण्यात आलेले होते.

तथापि दि. ०७-१२-२०२० रोजी प्रसिध्द केलेल्या जाहिरातीमध्ये नमूद केलेल्या पदांकरीता मोठ्या संख्येने अर्ज प्राप्त झालेले आहेत. प्राप्त अर्जांची संख्या व कोवीड रुग्णांच्या संख्येमध्ये झालेली घट विचारात घेता, जाहिरातीमध्ये नमूद केलेल्या पदांकरीता कोवीड१९ बाबतच्या मार्गदर्शक सुचनांची अंमलबजावणी करुन लेखी परीक्षा घेणेत येणार आहेत, याची सर्व संबंधित उमेदवारांनी नोंद घ्यावी. प्राप्त झालेल्या अर्जांचे अनुषंगाने उमेदवारांची यादी व लेखी परीक्षेबाबतच्या सविस्तर तपशील महापालिकेच्या संकेतस्थळावर अलहिदा प्रसिध्द करण्यात येईल.

17/12

(डॉ लक्ष्मण गोफणे)
सहा.आरोग्य वैद्यकिय अधिकारी
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी, पुणे ४११ ०१८

संकेतस्थळ - www.pcmcindia.gov.in
क्र. वैद्य/१७/कावि/ 279 /२०२०
दि. 17-१२-२०२०

E:\ABB\Mandhan2020\Dec2020\Recruitment_Advt_&_Other.docx